**नियमीत दिवाणी दावा क्र. ८०/२०१३ मधील निशाणी क्र. ८५ खालील आदेश**

सदरचा अर्ज हा वादींनी दिवाणी प्रक्रीया संहीता आदेश १ नियम १० अन्वये त्यांना दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणुन समाविष्ट करुन घेणेकरीता दिलेला आहे.

२. वादींच्या म्हणण्यानुसार प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल केलेला असुन वादीने त्याच्या उलटतपासामध्ये त्यांना बहीण चंद्रभागाबाई तुकाराम मुळे असल्याचे मान्य केलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत वाटपाच्या दाव्यामध्ये वादींची बहीण आवश्यक पक्षकार आहे. वादीची बहीण चंद्रभागाबाई मुळे हया दि.१८/०१/२०१० रोजी मयत झालेल्या आहे. त्यांच्या पश्चात त्यांना रमण मुळे व शकुंतला तिकांडे हे वारस आहेत. दावा हा वडीलोपार्जीत मिळकतीच्या वाटपासाठी असल्याने मयत चंद्रभागाबाई मुळे यांच्या वारसांचा देखील दाव्यामध्ये अविभक्त हिस्सा असल्याने त्यांना दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेण्याची विनंती केलेली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादीने त्यांचे म्हणणे दाखल केलेले असुन मयत चंद्रभागाबाई हया वादीची बहीण असल्याचे कबुल केलेले आहे. परंतु प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार प्रस्तुतचा दावा हा अंतीम युक्तीवादासाठी नेमलेला असुन वादींना त्यांच्या सख्ख्या बहीणीबाबत पुर्वीपासुन माहीती होती. वादींनी चंद्रभागाबाई यांना दाव्यात समाविष्ट न केल्याने दाव्यास आवश्यक पक्षकार समाविष्ट न केल्याची बाधा येत असल्याने वादींनी जाणीवपुर्वक प्रस्तुतचा अर्ज उशिराने दिलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींनी अर्ज नामंजुर करणेची विनंती केलेली आहे.

४. वादी व प्रतिवादीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

५.          दावा व दाखल कागदपत्रांचे अवलोकन करता प्रस्तुत दावा हा वाटप व मनाई हुकुमासाठी दाखल केल्याचे दिसुन येत आहे. त्याचप्रमाणे दाव्यातील मिळकत ही एकत्र कुटुंबाची वडीलोपार्जीत मिळकत असल्याचे वादीने कथन केले आहे. चंद्रभागाबाई ही वादीची सख्खी बहीण असल्याचे वादीने कथन केलेले आहे. अशा परिस्थितीत चंद्रभागाबाईच्या निधनानंतर तिचे वारस हे प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार असल्याचे दिसुन येत आहे. दावा वाटपाचा असल्याने दाव्यात कोणत्याही तांत्रिक त्रुटी राहु नये आणि दावा मिळकतीचे सर्व हिस्सेदार पक्षकार म्हणुन सामील असणेकरीता प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे रास्त आहे. वादीने प्रस्तुतचा अर्ज हा अंतीम युक्तीवादाच्या वेळी उशिराने दाखल केल्याची बाब अभिलेखावरुन दिसुन येते. त्यामुळे वादींनी प्रतिवादींना रक्कम रुपये २,०००/— खर्च म्हणुन देणे रास्त आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## <u>— आदेश —</u>

१. वादींनी प्रतिवादींना रक्कम रुपये २,०००/— (रुपये दोन हजार फक्त) खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी चंद्रभागाबाई यांचे वासांना प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करुन त्याप्रमाणे दाव्यात आवश्यक ती दुरुस्ती करावी.

३. दाव्यात दुरुस्ती केल्यानंतर वादीने दुरुस्त दाव्याची प्रत न्यायालयास, प्रतिवादींना दयावी.

४. वरील बाबींची पुर्तता झाल्यानंतर मयत चंदभागाबाई यांचे वारसांना दाव्याचे समन्स

काढण्यात यावे.

५. समन्स काढणेकरीता वादींनी कागदपत्रांच्या आणि दाव्याच्या प्रती पुरवाव्यात.

दिनांक :— ०४/०१/२०२४

(सु. वि. लाड)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
नांदगाव